सोमवार, दि. ५ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २७० वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जविघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# देशाला जे वाटते आहे ते होणारच!

## राजनाथ सिंह यांचा पाकिस्तानला इशारा; सनातन संस्कृती जागरण महोत्सव

**नवी दिल्ली -** भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सनातन संस्कृती जागरण महोत्सवात सहभाग घेतला होता. दिल्लीच्या या कार्यक्रमात राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला इशारा दिला आहे. मी देशाचा संरक्षण मंत्री आहे, त्यामुळे माझं हे कर्तव्य आहे की मी आपल्या सैनिकांसह आपल्या देशाच्या सीमांचं रक्षण करेन. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यकाळात देशाला जे वाटतं आहे ते होणारच असं म्हणत राजनाथ सिंह यांनी या कार्यक्रमात पाकिस्तानला इशारा दिला आहे.

आपल्या देशाकडे कुणी डोळे वटारुन पाहिले तर त्यांना मुंहतोड उत्तर देणं हे आमचं काम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींना सगळं माहीत आहे. तसंच तुम्हाला त्यांची कार्यशैली माहीत आहे. पंतप्रधान मोदी जोखीम पत्करु शकतात हे सगळ्यांनाच माहीत आहे. आपल्या देशाकडे डोळे वटारुन पाहणाऱ्या देशाला ते नक्की उत्तर देतील. पंतप्रधान नरेंद्र मोदींची शैली तुम्हाला सगळ्यांनाच माहीत आहे. मी या मंचावरुन तुम्हाला आश्वासन देतो की तुम्हाला जे वाटतं आहे तसंच उत्तर दिलं जाईल. असं राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

२०४७ पर्यंत भारत विकसित राष्ट्र होईल असं लक्ष्य पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ठेवलं आहे. हे लक्ष्य छोटं नाही हे तर आपण सगळेही समजू शकतो. पण तुम्ही सगळ्यांनी निश्चिंत राहा. हे लक्ष्य पूर्ण होणार म्हणजे होणारच. कारण हे सत्य आपण सगळ्यांनी स्वीकारलंच आहे की आपल्या देशाचा डंका आंतरराष्ट्रीय स्तरावर पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे वाजतो आहे. आपल्या देशाची किर्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढली आहे. पूर्वी अशी स्थिती होती की भारताने काहीही म्हटलं तरीही ती बाब गांभीर्याने घेतली जात नसे. भारत कमकुवत देश आहे असं म्हटलं जात होतं. आज मात्र ती परिस्थिती नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत जे म्हणणं मांडतो ते गांभीर्याने घेतलं जातं. सगळ्या जगाचं त्याकडे लक्ष असतं असंही राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर अनंतनागमध्ये २५ हून अधिक टुरिस्ट गाईड्सची चौकशी करण्यात आली आहे. तपास यंत्रणांना हे माहीत आहे की स्थानिकांच्या मदतीशिवाय हल्ला होणं हे जवळपास अशक्य आहे. त्यामुळे आता तपास यंत्रणा अधिक खोलात जाऊन तपास करत आहेत. दहशतवाद्यांना शोधण्यासाठीची मोहीम आणखी तीव्र करण्यात आली आहे.

## काँग्रेस फोडा, रिकामी करा -बावनकुळे

**पुणे -** भाजप प्रदेशाध्यक्ष आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुणे भाजप पदाधिकाऱ्यांच्या बैठकीला संबोधित केलं. यावेळी त्यांनी काँग्रेसला फोडा, काँग्रेस रिकामी करा असा मंत्र भाजप पदाधिकाऱ्यांना दिला. काँग्रेसमधून कोणी आलं तरी तुमचा विचार अगोदर करणार, असं बावनकुळे म्हणाले. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले,आज जिल्ह्याची बैठक पार पडली, सगळ्यांचा सत्कार करण्यात आला. पुढच्या काळात पक्षाचं संघटन अधिक मजबूत करून केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना सामान्य माणसांपर्यंत पोहोचवाव्यात अशा सूचना दिल्या आहेत.पुणे जिल्ह्याला मजबूत जिल्हा म्हणून पुढे घेऊन जाऊ, असंही बावनकुळेंनी म्हटलं.

युवा आदर्श

### न कळे ...

मोक्याच्या जागेवर
उभी राहे धर्मस्थळे
आली कशी रात्रीत
जादु कुणा न कळे
कोणकरतो सवाल
सर्वजण मुखदुबळे
चालत राही असेचं
अंधश्रद्धाळू रे खुळे
हवे तसे अतिक्रमण
जराही जागा मिळे
झेंडे रोवावेत पिवळे
हिरवे भगवे न् निळे
मुक्त अवैध वावराने
खोलवर जाती मुळे
शहर होई अत्यवस्थ
बा दुर्लक्ष केल्यामुळे
हात लाव धर्मस्थळा
सगळे काढतील गळे
दंगली भडकती त्वरे
दाब एकमेकांचे गळे
सर्व धर्म समभावाचे
विचार आता ते जुळे
सर्व धर्मांत घुसखोरी
उन्मत्त बेभान उधळे
वर्षामागून वर्षे जाती
कारवाई स्वयंकंटाळे
अतिक्रमणे मस्तवाल
शहर सौंदर्य कवटाळे

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# ‘ऑपरेशन ब्ल्यू स्टार काँग्रेसची चूक’

## राहूल गांधींनी चूक मान्य केली ?

**नवी दिल्ली -** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेतल्या त्यांच्या दौऱ्यात १९८४ मध्ये झालेलं ऑपरेशन ब्लू स्टार ही काँग्रेसची चूक होती हे मान्य केलं आहे. ८० च्या दशकात ज्या चुका पक्षाकडून झाल्या आहेत त्याची जबाबदारी मी घ्यायला तयार आहे. राहुल गांधींनी एका शीख युवकाच्या प्रश्नावर हे उत्तर दिलं. ज्यानंतर राहुल गांधींवर भाजपाने टीका केली आहे.

दोन आठवड्यांपूर्वी राहुल गांधी यांनी अमेरिका दौरा केला. त्यावेळी ते ब्राऊन विद्यापीठातल्या कार्यक्रमात सहभागी झाले. त्यावेळी तिथल्या शीख विद्यार्थ्याने ऑपरेशन ब्लू स्टारबाबत राहुल गांधींना प्रश्न विचारला. त्यावर राहुल गांधी म्हणाले की काँग्रेसची ती चूक होती. तसंच काँग्रेसच्या ज्या चुका ८० च्या दशकात झाल्या त्याची जबाबदारी मी घ्यायला तयार आहे. मी अनेकदा सुवर्ण मंदिरात गेलो आहे. शीख समुदायाबाबत माझ्या मनात आपुलकी आणि आदर आहे. मात्र ज्या घटना घडल्या त्याची जबाबदारी घ्यायला मी तयार आहे. तसंच जेव्हा ती घटना घडली तेव्हा मी राजकारणातही नव्हतो. पण हे सांगू इच्छितो की त्या घटनेची जबाबदारी मी घ्यायला तयार आहे.

ब्राऊन विद्यापीठात शीख विद्यार्थी म्हणाला की तुम्ही अजूनही शिखांशी तडजोड करण्याच्या दृष्टीने काही पावलं उचललेली नाहीत. सज्जन कुमार आणि केपीएस गिल यांच्यासारख्या लोकांना राजकीय सुरक्षा देण्यात आली. मग तुम्ही ही अपेक्षा कशी करता की आम्ही भाजपाला घाबरलं पाहिजे? हा प्रश्न विचारला असता राहुल गांधींनी हे उत्तर दिलं आणि ती काँग्रेसची चूक होती हे मान्य केलं.

दरम्यान राहुल गांधींचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यानंतर अमित मालवीय यांनी राहुल गांधींवर टीका केली आहे. राहुल गांधी आता भारतातच नाही तर जगभरात चेष्टेचा विषय ठरले आहेत असं त्यांनी म्हटलं आहे. तर भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते आर. पी. सिंह म्हणाले राहुल गांधी विदेशात जातात आणि देशाच्या विरोधात तिरस्कार पसरवण्याचं काम करतात. त्यांनी भारतात देशाच्या विरोधात बोलून दाखववावं मी त्यांच्या विरोधात खटला दाखल करेन असंही त्यांनी म्हटलं आहे. एनडीटीव्हीने हे वृत्त दिलं आहे.



भारतीय सैन्याने पंजाबच्या अमृतसरमधील सुवर्ण मंदिरात घुसून ऑपरेशन ब्लू स्टार फत्ते केलं होतं. स्वतंत्र खलिस्तानच्या निर्मितीसाठी पंजाबमध्ये हिंसा भडकली होती. या हिंसेला हवा देण्याचं काम ‘दमदमी टकसाल’चे जनरल सिंग भिंडरावाले यांनी केलं होतं. पंजाबमधील हिंसा, खलिस्तानी चळवळीने निर्माण केलेला उच्छाद मोडीत काढण्यासाठी तत्कालीन दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी ऑपरेशन ब्लू स्टारचे आदेश दिले होते. पुढे त्यांच्या हत्येने देशाला त्याची किंमतही मोजावी लागली. त्यामुळे पंजाबचा इतिहास लिहिताना ऑपरेशन ब्लू स्टार, इंदिरा गांधींची हत्या या गोष्टी प्रामुख्याने डोळ्यासमोर येतात.

## जालना येथे उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना येथे दि १५ मे २०२५ पासुन एक महीना कालावधीत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी स्वत:चा उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी व कर्ज प्रकरण करण्यासाठी हा प्रशिक्षण वर्ग अंत्यत महत्त्वाचा राहणार आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमात सौर ऊर्जा (सोलर एनर्जी) , विद्युत वाहणे (इलेक्ट्रिकल व्हेअकल) व सायबर सुरक्षा व इतर अनेक उद्योगा बाबतीत थेरी व प्रात्येक्षिकासह मार्गदर्शन राहणार आहे. या प्रशिक्षणात मशिनरी हाताळणे, सोलर एनर्जी प्लेट तयार करणे,कच्चामाल,साहीत्य,कॅप्रीसिटी,जोडणी व विक्रीव्यवस्था, बिघाड दुरुस्ती व उपलब्ध प्लॅन्ट या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा,व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, राष्ट्रीय पशुधन योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे. अधिक माहिती व प्रवेश अर्जासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी ,मिटकॉन द्वारा पत्रकार भवन, एस. पी. ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजूला जालना.मो.९४२३७३०९३२ येथे दि.१५ मे २०२५ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन के डी दांडगे मिटकॉन जालना यांनी केले आहे.

## निर्मला बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचा समाजभूषण पुरस्कार समाजसेवक संजय खैरेंना जाहीर

**पोलादपूर । प्रतिनिधी -** पोलादपूर तालुक्यातील सामाजिक, धार्मिक क्षेत्रात मागील वीस वर्षांपासून कार्यरत असणारे साखर गावचे सुपुत्र, सध्या मुंबई येथे व्यवसायानिमित्त वास्तव्यात असलेले संजय किसन खैरे यांना निर्मला सामाजिक बहुउद्देशीय संस्थेचा समाजभूषण पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे.

पोलादपूर तालुक्यातील दुर्गम भागातील साखर गावचे रहिवाशी असणाऱ्या संजय खैरे यांची घरची परिस्थिती हालाकीची असल्याने आपले प्राथमिक शिक्षण पुण्य झाल्यानंतर त्यांनी मुंबई गाठली. मुंबई येथे खासगी नोकरी करीत असताना १९९० पासून आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात केली. एकता सेवा संघ या संघाची स्थापना करून सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला. २०१० मध्ये बौद्धजन सेवा संघ मुंबई पोलादपूर या संघटनेच्या उप चिटणीस पदावर निवड करण्यात आली. २०१४ बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक ७३४ मानखुर्दचे अध्यक्ष, २०२२ मध्ये बौद्धजन सेवा संघ मुंबई पोलादपूर या संघटनेच्या चिटणीस पदी निवड, २०२४ मध्ये साखर बोरज बौद्धजन मंडळ या मंडळाचा अध्यक्ष अशी अनेक सामाजिक धार्मिक संघटनेची पदे संजय खैरे भूषवित आहेत.



निस्वार्थी, अभ्यासू, संघटना कौशल्य, निर्भीड असे अनेक गुण अंगी असणाऱ्या संजय खैरे यांची समाज भूषण पुरस्कारासाठी निवड करून निर्मला सामाजिक बहुउद्देशीय संस्थेने त्यांच्या कार्याची दखल घेतली आहे. समाजभूषण पुरस्कारासाठी निवड झाल्याने त्यांच्यावर साखर गावातून व पोलादपूर तालुक्यातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## टिकारियाज सायंस हॉबी सेंटरच्यावतीने विज्ञान कार्यशाळेचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** येथील टिकारियाज सायंस हॉबी सेंटरच्यावतीने येत्या मंगळवार (दि ६) पासून विज्ञान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी असून दि २० मे २०२५ पर्यंत सुरु राहणार आहे.

कार्यशाळा ही केवळ स्पर्धात्मक परीक्षांसाठीच नव्हे तर शालेय शिक्षणासाठी देखील विद्यार्थ्यांना खूप फायदेशीर ठरणार असल्याचे सायंस सेंटरचे संजय टिकारीया यांनी म्हटले आहे.

या कार्यशाळेत स्पर्धात्मक परीक्षांवर तसेच शालेय अभ्यासक्रमावर आधारीत दोनशे पेक्षा अधिक विज्ञान प्रात्यक्षिके हे विद्यार्थी स्वतः करणार आहेत.

आंतरराष्ट्रीय ज्युनियर सायन्स ऑलिंपियाड (IJSO), राष्ट्रीय विज्ञान ऑलिंपियाड (NSO), आंतरराष्ट्रीय विज्ञान ऑलिंपियाड (ISO), डॉ. होमी भाभा वैज्ञानिक स्पर्धा आदींच्या पूर्व तयारीसाठी ही महत्वपूर्ण ठरणार आहे.



विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करणे आणि वैज्ञानिक समज वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आधुनिक युगात सप्रयोग विज्ञान शिक्षण ही काळाची गरज असून या विज्ञान कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आवाहन संजय टिकारीया यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ८०८७२७३७७२, ८७८८१६४२७४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही श्री टिकारीया यांनी केले आहे.

कराड येथे अ.भा. नवोदित मराठी साहित्य संमेलन

## नवोदित साहित्यिकांसाठी मांदियाळी - अनिल खंदारे

**कराड । प्रतिनिधी** - येथे दि. ९ व १० मे २०१५ रोजी अखिल भारतीय मराठी साहित्यपरिषद आयोजित ३१ वे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन यशवंतराव चव्हाण साहित्य नगरीत संपन्न होणार आहे. साहित्य प्रेमींमध्ये उत्सुकतेचं वातावरण निर्माण झाले आहे. या संमेलनाचे उदघाटन माजी केंद्रीय कृषी मंत्री खा. शरदचंद्र पवार यांच्या हस्ते दि. ९ मे रोजी दुपारी ४.00 वा. टाऊन हॉल, कराड येथे होणार आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक मा. प्रविण गायकवाड यांची निवड झाली असून, स्वागताध्यक्ष म्हणून श्रीनिवास पाटील (माजी राज्यपाल सिकीम) यांची नियुक्ती झाली आहे.



दोन दिवसीय संमेलनात नवोदित साहित्यिक यांच्या साठी हा सुवर्णक्षण ठरणार आहे. ३00 च्या वर साहित्यिक यांची नोंदणी झाली असून जास्तीत जास्त नवोदित साहित्यिक यांनी सहभागी व्हावे असे आवाहन अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष अनिल खंदारे यांनी केले आहे.

# संपादकीय

## जात निहाय जनगणना

मागील आठवड्यात केंद्रीय मंत्रिमंडळाने जात निहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला. या संबंधीची घोषणा केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत केल्यानंतर संपूर्ण देशातून जात निहाय जनगणनेचे स्वागतच करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांपासून विरोधकांसह अनेक सामाजिक संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांसह विरोधकांकडून सातत्याने जात निहाय जनगणनेची मागणी होत होती. विशेषतः विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ही मागणी सातत्याने लावून धरली होती. उशिरा का होईना पण पण जात निहाय जनगणनेला मंजुरी देऊन सरकारने एक चांगला निर्णय घेलता आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच जात निहाय जनगणना होतेय हे विशेष याआधी इंग्रजांच्या काळात १८८१ ते १९३१ पर्यंत झालेल्या जनगणनेत जातींची गणना झाली होती. १९४१ च्या जनगणनेत देखील जातींची गणना करण्यात आली होती पण त्याची आकडेवारी जाहीर करण्यात आली नव्हती. १९५१ साली स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदा जनगणना झाली या जनगणनेत जात निहाय जनगणना व्हावी अशी मागणी झाली होती मात्र तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी त्यास नकार दिला त्यांच्या मते जात निहाय जनगणनेमुळे जातिजातीत विभाजन होऊन राष्ट्रीय एकतेला बाधा पोहचू शकते त्यामुळे त्यांनी जात निहाय जनगणेस नकार दिला होता. मात्र या जनगणनेत अनुसूचित जाती आणि जमातींची गणना करण्यात आली तशी ती प्रत्येक जनगणनेत करण्यात आली कारण अनुसूचित जाती जमातींची जनगणना व्हावी असे घटनेतच नमूद करण्यात आले आहे. अनुसूचित जाती जमातींची गणना जनगणनेत केली जाते मात्र इतर मागासवर्गीय जातींची गणना करण्यात येत नव्हती ती आता करण्यात येईल. जात निहाय जनगणना हा एक चांगला निर्णय आहे. जात निहाय जनगणना झाल्याने सर्व जातींची लोकसंख्या मोजण्यात येईल त्यामुळे कोणत्या जातींची किती लोकसंख्या आहे ते समजेल. १९३१ साली झालेल्या जनगणनेत मागासवर्गीय जातींची लोकसंख्या ५२ टक्क्यांहून अधिक असल्याचे सांगण्यात आले होते. मंडल आयोगाने इतर मागास वर्गाला आरक्षण देताना हीच लोकसंख्या ग्राह्य धरून इतर मागास वर्गाला २७ टक्के आरक्षण दिले होते. इतर मागास वर्गाची लोकसंख्या यापेक्षा अधिक आहे त्यामुळे २७ टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण मिळायला हवे अशी मागणी इतर मागास वर्गाकडून होऊ लागली होती. आता जात निहाय जनगणना झाल्यामुळे सर्व जातींची लोकसंख्या मोजली जाईल त्यामुळे या वर्गाची नाराजी दूर होईल. जात निहाय जनगणना झाल्याने आरक्षणाची जी ५० टक्के मर्यादा आहे ती देखील वाढवली जाईल. सध्या सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा ५० टक्के ठेवली आहे. जात निहाय जनगणनेमुळे संसद आणि विधान सभेचे चित्रही बदलू शकते. शिवाय जात निहाय जनगणना झाल्यावर प्रत्येक जातीच्या विकासासाठी त्यांच्या लोकसंख्येनुसार निधी उपलब्ध करून दिला जाईल. जात निहाय जनगणनेमुळे प्रत्येक जातीची शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थितीबद्दल स्पष्टता येईल. या आकडेवारीत स्पष्टता आल्यावर सरकार त्यांच्यासाठी अधिक मजबूत धोरणे बनवू शकेल एकूणच जात निहाय जनगणना ही देशाच्या सामजिक आणि आर्थिक क्षेत्रावर दूरगामी परिणाम करणारी ठरेल. आता प्रश्न असा आहे की ही जात निहाय जनगणना होणार कधी ? जात निहाय जनगणने संदर्भातील विधेयक आगामी पावसाळी अधिवेशनात मांडले जाऊ शकते. म्हणजेच सप्टेंबर पासून जात निहाय जनगणनेची प्रारंभिक प्रक्रिया सुरू होऊ शकते. मात्र प्रत्यक्ष जात निहाय जनगणना एप्रिल २०२६ पासून सुरू होण्याची शक्यता आहे. २०२१ सालीच ही जनगणना व्हायला हवी होती मात्र कोरोणामुळे ती पुढे ढकलण्यात आली आता ती पुढील वर्षी होण्याची शक्यता आहे. जनगणना ही दर दहा वर्षांनी होते. जनगणना ही दीर्घ चालणारी प्रक्रिया आहे. प्रत्यक्ष जनगणनेचे काम जरी काही महिनेच असले तरी त्यातून येणाऱ्या आकडेवारीचे प्रामाणिकिकरण आणि प्रकाशनासाठी एक दोन वर्ष लागतात म्हणजेच या जात निहाय जनगणनेची आकडेवारी २०२७ सालीच हाती येईल. या जात निहाय जनगणानेसाठी सुमारे १४ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे त्याची तरतूद आगामी अर्थसंकल्पात केली जाईल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# गोव्यातील लैराईदेवी उत्सवादरम्यान झालेली चेंगराचेंगरी अत्यंत दु:खद

लैराईदेवी यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी गोवा,महाराष्ट्र आणि कर्नाटक येथुन दरवर्षी ७० ते ८० हजार भाविक याठिकाणी पोहचत असतात. परंतु दिनांक ३ मे २०२५ शनिवारला गोव्याच्या उत्तर भागात असलेले शिरगांव येथील श्री लैराईदेवी मंदिरात पहाटे ३ ते ४ च्या दरम्यान भाविकांमध्ये अचानक चेंगराचेंगरीची घटना घडली यात ६ लोकांचा मृत्यू झाला असून ५ जण व्हेंटिलेटरवर आहेत व ८० पेक्षा अधिक घायल असल्याचे सांगितले जाते.वार्षिक उत्साहासाठी हजारो भाविक अरूंद गल्ल्यांमधुन मंदिरात येत असतांना ही भयावह घटना घडली.मंदिरातील उत्सवासाठी किमान ३० ते ४० हजार भाविक एकत्र जमले होते.यातील काही जण उतार असल्याने खाली पडले.त्यामुळे इतरही लोक एकमेकांच्या अंगावर कोसळल्याने भयावह चेंगराचेंगरीचा घटना झाली.दरवर्षी कुठे ना कुठे चेंगराचेंगरीच्या घटनांचा प्रकार दिसून येतो. यामुळे जीवितहानी सुध्दा होते.त्याची पुनरावृत्ती आपल्याला गोव्याच्या शिरगांव येथील लैराईदेवी मंदिराजवळ दिसून आली.अशाच प्रकारची घटना आंध्रप्रदेशातील प्रसिद्ध तिरूपती बालाजी मंदिराजवळ वैकुंठ व्दार दर्शनाच्या टोकन वितरण केंद्रावर झालेल्या चेंगराचेंगरीत दिनांक ८ जानेवारी २०२५ ला ६ जणांचा मृत्यू झाला होता व ४० हुन अधिक गंभीर जखमी झाले होते.टोकन वितरण केंद्र सकाळी ५ वाजता उघडण्याचे नियोजन होते.यासाठी भाविक रांगा लावू लागले व प्रचंड गर्दी झाली होती. विविध केंद्रावर सुमारे ४००० हजारहून अधिक भाविक रांगेत उभे होते व चेंगराचेंगरीमुळे मोठा गोंधळ उडाला आणि त्यात एका महिलेचा प्रथम मृत्यू झाला व नंतर गंभीर जखमी झालेल्या ५ भाविकांचा मृत्यू झाला अशाप्रकारे ६ भाविकांना चेंगराचेंगरीत आपले प्राण गमवावे लागले.देशात दरवर्षी अनेक ठिकाणी मंदिर परिसर, प्रवचन परिसर, किर्तन परिसर, गर्दीचे ठिकाण,रेल्वे स्टेशन किंवा अन्य ठिकाणी चेंगराचेंगरीचे प्रकार होतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी सुध्दा झालेली आहे आणि याचे जिवंत उदाहरण आपल्याला गोव्यातील लैराईदेवी मंदिर परिसरात दिसून आले. चेंगराचेंगरीचे प्रकार का होतात याला मुख्य जबाबदार कोण याचाही विचार आपण सर्वसामान्यांनी, मंदिर प्रशासनाने व स्थानिक प्रशासनाने केला पाहिजे.कारण भाविकांनी भीड करायची व मंदिर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करायचे त्याचे प्रयचित्य भाविकांनी भोगायचे अशी परिस्थिती आज चेंगराचेंगरीच्या प्रकारात दिसून येते म्हणजेच आ बैल मुझे मुझे मार अशी परिस्थिती झालेली आहे.भारतातील चेंगराचेंगरीच्या अनेक भयावह घटना झालेल्या आहेत यामध्ये ५ मार्च २०१० ला उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला.भारतात बऱ्याच ठिकाणी अपुऱ्या आणि पायाभूत सुविधांच्या मर्यादांमुळे असुरक्षितता असते. अनेकदा दुर्गम ग्रामीण भागात, डोंगराळ प्रदेशात, टेकड्यांवर किंवा योग्य मार्ग नसलेल्या नदीकाठावर धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन केले जाते. अशा ठिकाणी असलेला तीव्र उतार, स्थळाची असमान भूरचना,अरुंद मार्ग, एकाच ठिकाणी भाविक एकत्रित येणे या कारणांमुळे धार्मिक कार्यक्रमामध्ये मोठे धोके निर्माण होतात. त्यातून चेंगराचेंगरीच्या घटना घडतात.धार्मिक किंवा सामूहिक कार्यक्रम घेताना व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करते व दुर्घटना उद्भवतात. इंटरनॅशनल जर्नल ऑफ डिझास्टर रिस्क रिडक्शननं (आयजेडीआरआर)ने प्रकाशित केलेल्या २०१३ च्या अभ्यासात असं दिसून आलं की, भारतातील ७९ टक्के चेंगराचेंगरीचे ठिकाणे हे धार्मिक मेळावे आणि तीर्थयात्रेची ठिकाणे आहेत. विकसित देशांमध्ये बहुतेक चेंगराचेंगरी स्टेडियम, संगीत मैफिली आणि नाईट क्लबच्या ठिकाणी होतात. परंतु भारत आणि इतर विकसनशील देशांमध्ये चेंगराचेंगरीच्या बहुतेक दुर्घटना धार्मिक स्थळांवर होतात,असे केरळ सरकारच्या भू आणि आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे सहाय्यक प्राध्यापक फैसल टी. इलियास यांनी सांगितले. ४ जुलै २०२४ उत्तर प्रदेशातील हाथरस येथे एका धार्मिक कार्यक्रमात चेंगराचेंगरी होऊन किमान २७ जणांचा मृत्यू झाला,१७ फेब्रुवारी २०२४ उत्तर प्रदेशातील मथुरा येथील पूजनीय श्रीजी मंदिरात होळीपूर्वी झालेल्या कार्यक्रमादरम्यान चेंगराचेंगरीत किमान सहा भाविक बेशुद्ध पडले तर काही जण जखमी झाले,२४ डिसेंबर २०२३ मथुरा येथील बांके बिहारी मंदिरात गर्दीमुळे गुदमरून दोन महिला भाविकांचा मृत्यू झाला,१ जानेवारी २०२२ जम्मू आणि काश्मीरमधील प्रसिद्ध माता वैष्णोदेवी मंदिरात भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे झालेल्या चेंगराचेंगरीत १२ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले,२१ एप्रिल २०१९ तामिळनाडूच्या त्रिची येथील मंदिर उत्सवात चेंगराचेंगरीत सात जणांचा मृत्यू झाला,१० ऑगस्ट २०१५ झारखंडमधील देवघर शहरातील एका मंदिरात चेंगराचेंगरीत किमान ११ जणांचा मृत्यू आणि ५० जण जखमी झाले,१४ सप्टेंबर २०१४ आंध्र प्रदेशातील राजमुंद्री येथे 'पुष्करम' उत्सवाच्या उद्घाटनाच्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी जमली होती गोदावरी नदीच्या काठावरील एका प्रमुख स्नानस्थळावर चेंगराचेंगरीत २७ यात्रेकरूंचा मृत्यू आणि २० जण जखमी झाले,२५ ऑगस्ट २०२४ ला मध्यप्रदेशातील सतना जिल्ह्यातील एका मंदिरात अफवेमुळे चेंगराचेंगरी झाल्यानं दहा यात्रेकरू ठार आणि २० हून अधिक जखमी झाले,१३ऑक्टोबर २०१३ मध्यप्रदेशातील दातिया येथील रतनगढ मंदिराजवळ चेंगराचेंगरीत ८९ जणांचा मृत्यू आणि १०० हून अधिक जखमी झाले,१४जानेवारी २०११ केरळमधील सबरीमाला मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत १०६ यात्रेकरू ठार तर १०० हून अधिक जखमी झाले,४ मार्च २०१० उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला, ३०सप्टेंबर २००८ राजस्थानमधील जोधपूरमधील मेहरानगड किल्ल्याच्या परिसरात असलेल्या चामुंडा देवी मंदिरात चेंगराचेंगरीत २४४ लोकांचा गुदमरून मृत्यू झाला,३ ऑगस्ट २००६ हिमाचल प्रदेशातील नैना देवी मंदिरात चेंगराचेंगरीत सुमारे १५० भाविकांचा मृत्यू आणि ४०० हून अधिक जखमी झाले,२६ जानेवारी २००५ ला पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील वाई जवळील मंदेर देवी मंदिरात वायरिंगमध्ये शॉर्ट सर्किटमुळे ठिणग्या निघाल्यानं घाबरलेल्या हजारो भाविकांनी गर्दी केली होती. मंदिराकडे जाणाऱ्या अरुंद मार्गावर गर्दी झाल्याने चेंगराचेंगरी झाली व लोक एकमेकांवर पडल्याने २९१ जणांचा मृत्यू झाला तर २०० हून अधिक जण जखमी झाले,२७ ऑगस्ट २००३ नाशिक कुंभातील पवित्र स्नानादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ३९ जणांचा मृत्यू झाला तर १४०जण जखमी झाले. चेंगराचेगरीच्या भयावह घटना पहाता त्या टाळण्यासाठी मंदिर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सर्वसामान्यांनी किंवा भाविकांनी गर्दीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याठिकाणी आपण जावे की नाही याचा गंभीरतेने विचार करूनच गेले पाहिजे. मंदिर परिसरातील वाढत्या चेंगराचेंगरीच्या घटना पहाता मंदिर प्रशासनावर राज्य सरकारने व केंद्र सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे व त्यांच्या चुका उघड करून कारवाई करून त्यात सुधारणा करण्याची आज गरज आहे.देशातील संपूर्ण मंदिरे हे भारतीय संस्कृतीचे आस्थेचे प्रतिक आहे आणि मंदिर प्रशासन व सरकार यांच्यात तालमेल व्यवस्थित असला चेंगराचेंगरीच्या भयावह घटना सहज टाळता येतात. अशाप्रकारे वरील भयावह घटना टाळण्यासाठी भाविक,मंदिर प्रशासन, स्थानिक प्रशासन,राज्य सरकार व केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष केंद्रित केले पाहिजे व अशा घटनांच्या बाबतीत सतर्कता बाळगली पाहिजे.कारण या दुर्घटना आपण सहज टाळु शकतो.याकरीता सर्वांनीचजान है तो जहान है हा मुलमंत्र अंगीकारला हवा आणि अशा गंभीर दुर्घटनांवर अंकुश लावला पाहिजे.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# समाजमाध्यमांतील 'इन्फ्लुएंसर'ने स्वतः ची खरी ओळख जपणे गरजेचे

## 'बेस्ट प्रॅक्टिसेस फॉर सोशल मीडिया डव्हर्टायझिंग फॉर इन्फ्लुएंसर' परिसंवाद

**मुंबई -** समाजमाध्यमांतील इनफ्लुएसर्सने स्वतः ची खरी ओळख जपणे गरजेचे असल्याचे मत 'बेस्ट प्रॅक्टिसेस फॉर सोशल मीडिया डव्हर्टायझिंग फॉर इन्फ्लुएंसर' या परिसंवादात व्यक्त करण्यात आले.

बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये आयोजित वेव्हज २०२५ दृकश्राव्य आणि मनोरंजन समिटमध्ये या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये सहभागी सहेली सिन्हा म्हणाल्या, इन्फ्लुएंसरने जबाबदारीने विविध ब्रँडसोबतची भागीदारी केली पाहिजे. ब्रँडसोबत केलेली भागीदारी ही केवळ जाहिरात करणे एवढेच नसून ती एक मोठी जबाबदारी आहे. कारण ग्राहक प्रभावी व्यक्तींवर विश्वास ठेवून त्यांनी जाहिरात केलेल्या गोष्टी विकत घेत असतात. त्यामुळे इन्फ्लुएंसरने स्वतः त्या गोष्टीची माहिती, अनुभव घेऊन मगच त्याबाबत इतरांना सांगण्याची पारदर्शकता जोपासणे आवश्यक आहे. जाहिरात करताना नेहमी अटी व शर्ती आणि त्या-त्या समाज माध्यमांचा वापर करण्यासाठीच्या सूचना, नियमावली पाळण्यास प्राधान्य दिले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

शिबानी अख्तर यांनी समाजमाध्यमंतील इन्फ्लुएंसरने प्रामाणिकपणास महत्त्व द्यावे. प्रामाणिक कंटेंट दीर्घकाळ टिकतो आणि विश्वास निर्माण करतो. आरोग्यासारख्या संवेदनशील विषयांवर ब्रँडिंग करताना विशेष सतर्कता बाळगली पाहिजे, असेही यावेळी सांगितले.

विनय पिल्लई म्हणाले, कोणत्याही माध्यमातून व्यक्त होताना त्या प्लॅटफॉर्मची कार्यपद्धती नीट समजून घेऊन त्या चौकटीत आपले सादरीकरण करावे. कारण प्रत्येक सोशल मिडिया प्लॅटफॉर्मचा उपयोग वेगळ्या कारणासाठी केला जातो. हे लक्षात घेऊन आपल्याकडील वैशिष्ट्यांची ओळख करून त्यानुसारच कंटेंट बनवावा. स्वतःची विशिष्ट ओळख विकसित करावी. सोशल मिडिया प्रभावी असले तरी दूरचित्रवाणी आजही प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले.

मयंक शेखर यांनी विश्वास व विश्वासार्हता निर्माण करण्याची गरज असून सातत्याने अधिकृत माहिती मांडणे म्हणजे विश्वासार्हतेची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले. प्रभावी व्यक्तींनी केवळ ट्रेंड फॉलो न करता, योग्य आवश्यक बाबी मांडल्या पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले.

तनू बॅनर्जी यांनी माध्यमे सतत बदलत आहेत, त्यामुळे इन्फ्लुएंसरनेही आपल्या कार्यपद्धती बदलायला हवी. ग्राहकांना शिक्षित करणे व सजग ठेवणे देखील प्रभावी व्यक्तींची जबाबदारी आहे, असे सांगितले.

## पुस्तकांचे वाचन वाढवा...

पुस्तकांचे वाचन फार कमी झाले आहे...
व्यसनाचे प्रमाण फोफावले आहे....
जमाना खूप चंगळवादी झाला आहे....
पुस्तकांच्या वाचनाने माणूस माणसात येतो...
वाईट व्यसनाने माणूस माणसातून उठतो...
इज्जतीचा पार कचरा करून घेतो....
वाचनाने माणूस ज्ञानवंत व प्रज्ञावंत होतो....
अन्यायाविरुद्ध प्रहार करायला शिकतो...
लेखनातून भाषणातून सामाजिक समस्या मांडतो...
वाचनाने माणसाची बुद्धी प्रगल्भ होते...
विचार करण्याची क्षमता वेगवान होते...
मनातील घाण साफ होऊन मन शुद्ध होते....
पण लोकांना वाचनाचे महत्त्व केव्हा कळणार...?
वाचनालयाकडे मन त्यांचे कधी वळणार...?
मोबाईलच्या युगात तेवढी समज त्यांना कधी येणार...?
त्यासाठी आई-वडिलांचा जीवन संघर्ष आठवावा लागेल...
महापुरुषांचा जीवन लढा ज्ञात करावा लागेल...
शिक्षणाचे महत्त्व जाणून घ्यावे लागेल...
म्हणून पुस्तकांचे वाचन खूप खूप वाढवा...
वैचारिक पातळी तल्लख व मजबूत ठेवा...
फुले शाहू आंबेडकरांना आदर्श स्थानी ठेवा...

**-बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## वाचकांचे मनोगत

### हीच का धर्मनिरपेक्षता ?

भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे; या तत्त्वानुसार सर्व धर्मीयांना समान न्याय-नियम असायला हवेत. मात्र हिंदूंच्या बाबतीत त्या न्याय-नियमांमध्ये दुजाभाव दिसून येतो. याचे सर्वात मोठे आणि बऱ्याच वेळेला चर्चेत असणारे उदाहरण म्हणजे हिंदूंची मंदिरे ! हिंदूंच्या बहुतांश मंदिरांवर सरकारचे नियंत्रण आहे. भारतातील मोठी मोठी मंदिरे ही सरकारच्या ताब्यात आहेत. सरकारीकरण झालेल्या या मंदिरांच्या ट्रस्ट किंवा बोर्ड सदस्यांमध्ये इतर धर्मीय सुद्धा चालू शकतात, याउलट अन्य धर्मियांची प्रार्थनास्थळे त्या त्या समुदायाच्या ताब्यात आहेत. त्यांच्यावर सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही. त्यांच्या ट्रस्ट किंवा बोर्ड सदस्यांमध्ये केवळ त्यांच्याच धर्मातील लोक असतात. भारतीय संविधानात अल्पसंख्याकांना विशेष संरक्षण आणि अधिकार प्राप्त आहेत, त्यामुळे त्यांच्यावर कोणतेही धार्मिक कर नाहीत. हिंदूंच्या मंदिरांवर मात्र सरकार कर लावते. प्रतिवर्षी हिंदू मंदिरांचे जवळपास एक लाख करोड रुपये धन, जे हिंदू भाविक श्रद्धेने मंदिरात अर्पण करतात ते पूर्णपणे सरकारच्या ताब्यात जाते आणि सरकार या पैशातून अन्य धर्मियांना साहाय्य करते. हिंदूंच्या मंदिराचा पैसा सर्व धर्मीयांसाठी वापरला जातो, मात्र हे धर्मनिरपेक्षतेचे तत्व इतर धर्मियांना का लागू नाही.

**- अक्षता चौधरी, परभणी**

## वाचकांचे मनोगत

### गेमचा (जुगार) विकरवा

हाऊसी, तांबोला किंवा बिंगो हा एक मनोरंजनासाठी खेळला जाणारा गेम घरी , सोसायटीत, किटी पार्टीत किंवा कौटुंबिक कार्यक्रमामध्ये खेळता खेळता या खेळाचे स्वरूप जुगारामध्ये कधी रूपांतरित झाले, हे कोणालाच कळले नाही. त्याचे दुष्परिणाम सर्वजण भोगत आहेत.

बुद्धी असुनही पैशाच्या मोहापायी या जुगारामध्ये माणूस खेचला जात आहे. याचे गंभीर परिणाम जाणून आता हे गेम बंद व्हावे म्हणून कायदे करण्याची वेळ येणे, हे गंभीरच आहे. या खेळांमुळे आर्थिक नुकसान, मनस्वास्थ बिघडणे, चिडचिडेपणा, आत्मविश्वास कमी होणे असे मानसिक परिणाम होऊ लागले. 'मला जिंकायचे आहे, खूप पैसा मिळवायचा आहे', या विचाराने अनेक तरुणांना पछाडले आहे. यातून कौटुंबिक आणि सामाजिक स्वास्थ्य बिघडत चालल्याचे दिसत आहे. यावर उपाय म्हणजे कुटुंबातील सदस्यांनी आपल्या पाल्यांकडे लक्ष द्यायला हवे. मुलांना मोबाईल ऐवजी मैदानी खेळांकडे वळवायला हवे. तसेच याचे दूरगामी दुष्परिणाम लक्षात घेऊन अशा गेमवर कायमस्वरूपी बंदी घालयला हवी !

**- प्रा.रोहिणी गोविंद जोशी, संभाजीनगर**

## वाचकांचे मनोगत

### टँकर मुक्तीसाठी मानसिकता हवी

दरवर्षी उन्हाळा येतो .उन्हाळ्यात पाणी आणायचे कुठून हा प्रश्न पडतो.पाणी स्त्रोत असणारे झरे,वाहळ,नद्या ,धरणे ,विहीर मधील पाणी तळ गाठते.पाण्यासाठी ग्रामीण भागातील महिला कित्येक किलोमीटर पायपीट करून पाणी आणतात. सरकारच्या पाणी पुरवठा खात्याकडून दरवर्षी पाणी टंचाई असलेल्या वाड्या,गाव यांची यादी वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करण्यात येते.पाणी टंचाई ग्रस्त गावांना टँकरने पाणी पुरवठा करण्यात येईल. संपली जबाबदारी .प्रति टँकर पाण्याचा खर्च काढून सरकारच्या संबंधित विभागाकडे सादर केल्यानंतर पुढील सोपस्कार पूर्ण होतात.पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी उपयोगात आणण्यासाठी सरकारच साठवण टाक्या का बांधत नाही. महाराष्ट्रातील सर्व विभागांपेक्षा कोकण विभागात सर्वाधिक पाऊस पडतो.पावसाचे पाणी समुद्राला जाऊन मिळते ते उपयोगात का आणले जात नाही .कोकणातील सर्व तालुक्यातील गावांची ,वाड्यांची जानेवारीपासून पाण्यासाठी वणवण सुरु होते.ग्रामपंचायतीच्या नळपाणी योजनेतून दररोज अर्धा तास कमी दाबाने पाणी पुरवठा करण्यात येतो.यात सुधारणा कधी होणार ? गावा पेक्षा शहरातील लोक पाण्यात बाबतीत सुखी म्हणावे लागतील. दररोज सुरळीत पाणी पुरवठा होतो.तसे ग्रामीण भागात नाही .यंत्रणेतील बिघाड झाल्यास न बोललेलेच बरे अशी अवस्था ग्रामीण भागातील आहे.आमचे लोकप्रतिनिधी स्वत:हून या समस्येवर उपाय शोधणार नाहीत तो पर्यंत टँकर मुक्त महाराष्ट्र हे स्वप्न राहील. स्वप्न साकार करण्यासाठी शासन ,लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांनाच निर्णय घेऊन पाण्याच्या समस्येतून बाहेर पडावे लागेल. ६५ वर्षांत टँकर पद्धतीवर उपाय शोधले नाहीत आता तरी शोधा एवढ्याच अपेक्षा पुढच्या पिढीसाठी.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई**
९८६९४७६२०९,
mahadeogolvaskargmail.com

# ३ ते ४ महिने मी केवळ पटकथेसोबतच राहतो- आमिर खान

**मुंबई -** चतुरस्त्र अभिनेते- सर्जनशील निर्माते आमिर खान यांनी आज वेव्हज २०२५ मध्ये क्रिएटोस्फियर मंचावर ‘ अभिनयाची कला’ या विषयावरील त्यांच्या अतिशय सहजसोप्या आणि उपयुक्त सल्ल्यांनी अनेकांची मने जिंकली. त्यांच्या चित्रपट निर्मितीच्या अनेक वर्षांच्या अनुभवातून मिळालेला हा व्यावहारिक सल्ला देत असताना, हे अनुभवी अभिनेते म्हणाले, मी प्रशिक्षित अभिनेता नाही. मी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामध्ये जाण्याची माझी इच्छा होती, पण जमलं नाही. मी माझ्या वाटचालीत या लहान-लहान गोष्टी शिकलो, ज्या माझ्यासाठी उपयोगी ठरल्या. चित्रपट निर्मितीच्या भविष्याबद्दल बोलताना, आमिर खान म्हणाले की, एआय तंत्रज्ञानामुळे आता अभिनेत्याशिवाय दृश्य चित्रित करणे शक्य झाले आहे! एआय आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने नंतर दृश्यात अभिनेत्याला जोडले जाऊ शकते. एखाद्या अभिनेत्यासाठी सर्वात पहिले आणि महत्त्वाचे काम म्हणजे त्या पात्राच्या मनात प्रवेश करणे, असे या अष्टपैलू अभिनेत्याने सांगितले, ज्यांनी गेल्या अनेक वर्षांत साकारलेल्या अनेक अविस्मरणीय भूमिकांची भारतीय सिनेमाला भेट दिली आहे. आणि त्या भूमिकेच्या अंतरंगात ते कशा प्रकारे सामावून जातात? त्यावर या सिनेक्षेत्राला वाहून घेतलेल्या अभिनेत्याचे उत्तर आहे, मी स्क्रिप्टसोबत खूप




वेळ घालवतो. मी पटकथा पुन्हा पुन्हा वाचतो. जर पटकथा चांगली असेल, तर तुम्हाला त्या पात्राची समज येईल, त्याचे भौतिक स्वरुप, वृत्ती इत्यादी सर्व काही त्यातूनच येईल. याव्यतिरिक्त, दिग्दर्शकाशी पात्राबद्दल आणि कथेबद्दल चर्चा केल्याने देखील कल्पना येते. अतिशय परिश्रम करण्याच्या आपल्या वृत्तीविषयी स्पष्टीकरण देताना आमिर खान यांनी सांगितले, माझी स्मरणशक्ती कमी आहे. त्यामुळे मी हाताने संवाद लिहितो. सर्वात आधी मी अवघड दृश्ये करायला घेतो. संवादांचे पाठांतर झालेच पाहिजे. पहिल्या दिवशी मी केवळ त्यावर काम करतो, तीन ते चार महिने मी दररोज तेच करत राहतो आणि मग त्यामध्ये शिरतो. संवाद हे तुमच्यामध्ये सामावले पाहिजेत. ते तुमचे स्वतःचे वाटले पाहिजेत. ज्यावेळी ते लिहिले गेले तेव्हा ते पटकथाकाराचे होते. पण नंतर ते तुमचे झाले आहेत. ज्यावेळी तुम्ही एक ओळ पुन्हा पुन्हा उच्चारता, तेव्हा तुम्हाला जाणीव होते की हे तुम्ही अनेक प्रकारे करू शकता. कलाकारांसाठी सर्वात कठीण काम कोणते असते? त्यावर आमिर खान म्हणाले, की कलाकाराला दररोज पुन्हा पुन्हा त्याच उत्कटतेने भावनिक अभिनय सादर करावा लागणे. नवोदित कलाकारांसाठी आमिर खान यांनी आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगितली आणि ती म्हणजे - तुमचे काम तुम्ही जितके प्रामाणिकपणे कराल, तितके ते उत्तम होईल. तर, मग खुद्द आमिर खान त्यांच्या दृश्यांचा सराव कसा करतात? याचे उत्तर असे, की मी शॉट्स देण्यापूर्वी त्या दृश्याची कल्पना करतो आणि त्या दृश्यांचा सराव करत असताना मी कधीच आरशात पाहत नाही. आतापर्यंतच्या सर्व चित्रपटांपैकी आमिर खान यांचा आवडता चित्रपट कोणता? अनेकांनी अंदाज लावलाच असेल, की तो चित्रपट 'तारे जमीन पर' असावा. तर होय, कारण या चित्रपटाने अनेक पालकांना त्यांच्या मुलांशी संयमाने वागायला, त्यांना प्रसंगी आधार द्यायला आणि त्यांच्या लहान मुलांशी सहानुभूतीपूर्वक वागायला शिकवले! अभिनय क्षेत्रात सुरुवात करणाऱ्या नवोदितांसाठी या ज्येष्ठ अभिनेत्याकडे आणखी कोणत्या टिप्स आहेत? भावना या पटकथेतूनच समोर येतात. तुमचा पटकथेवर विश्वास असावा लागतो. कधीकधी चित्रपटांमध्ये अशी काही दृश्ये असतात, जी अविश्वसनीय वाटतात. पण अभिनेता तुम्हाला त्यावर विश्वास ठेवायला भाग पाडतो. त्यामुळे अभिनेत्याला प्रेक्षकांना पडद्यावर दाखवली जाणारी गोष्ट पटवून सांगावी लागते. चांगली पटकथा म्हणजे काय असते? आमिर खान यांनी उत्तरात सांगितले, की चांगल्या पटकथेला उत्तम संकल्पनेचा आधार असावा लागतो. कथेच्या पहिल्या दहा टक्के भागात कथानकाचे ध्येय निश्चित झाले पाहिजे. नाहीतर प्रेक्षकांचा हिरमोड होईल. मात्र, चित्रपटामध्ये सहभागी असलेल्या सर्वांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना म्हणजे - जे त्या दृष्यामध्ये अपेक्षित आहे, ते करा आणि निव्वळ तुमच्या स्वतःच्या कामापुरता विचार करू नका.

# सिनेमाच्या प्रभावी मांडणीत दिग्दर्शकाची जबाबदारी महत्वाची - रिची मेहता

## ‘बिहाइंड द फ्रेम : मास्टरिंग द आर्ट ऑफ द सिनेमा’ चर्चासत्र

**मुंबई -** सिनेमामध्ये एखाद्या विषयावर मांडणी करताना दिग्दर्शकाचा दृष्टीकोन जसा आहे त्याच पद्धतीच्या फ्रेममधून दिग्दर्शक सिनेम प्रेक्षकापर्यंत नेतो. आपल्या सिनेमातून नेमका काय संदेश प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायचा आहे याची जबाबदारी दिग्दर्शक म्हणून खूप महत्वाची असते, असे प्रतिपादन रिची मेहता यांनी केले.

बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जिओ वर्ल्ड सेंटर मध्ये आयोजित वेव्हज २०२५ दृकश्राव्य आणि मनोरंजन समिट मध्ये ‘बिहाइंड द फ्रेम : मास्टरिंग द आर्ट ऑफ द सिनेमा’ या विषयावर आयोजित मास्टरक्लासमध्ये रिची मेहता मध्ये बोलत होते.

रिची मेहता म्हणाल्या की, सिनेमा अत्यंत प्रभावी माध्यम असून त्याचा योग्य वापर करून दिग्दर्शक आपल्या विषयाला निश्चितच परिणाम कारक पद्धतीने एकाचवेळी देश-विदेशात पोहचवू शकतो. स्वानुभवातून निर्माण झालेले कथानक, विषयसूत्र हे अधिक सशक्तपणे मांडता येतात, जे प्रेक्षकांनाही सहजतेने भावतात. नाटक, काल्पनिक कथानक यावर आधारित सिनेमा कोणत्याही माध्यमातून व्यक्त केल्या जाणाऱ्या आशयाची प्रामाणिकता, सत्यता ही ठळकपणे बघणाऱ्यांच्या लक्षात येते, हे लक्षात घेऊन अधिक संवेदनशीलतेने भोवतालच्या घटना, प्रसंग यांच्याकडे बघता आले पाहिजे.

सिनेमा आणि वेबसिरीज यांच्या विषयांच्या मांडणीमध्ये तसेच प्रेक्षकवर्गामध्ये फरक असतो. सिनेमामध्ये विषय, पात्र आणि त्याची मांडणी यांचा प्राधान्यक्रम वेगळा असतो आणि वेबसिरीजमध्ये हे घटक सिनेमासारख्या क्रमाने येत नाही तर तिथे ते वेगळ्या पद्धतीने येतात, दोन्ही माध्यमे प्रभावी असून त्याचा सुयोग्य वापर करून दिग्दर्शक आपल्या विषयाला निश्चितच परिणामकारक पद्धतीने व्यापक प्रमाणात समाजापर्यंत पोहचवू शकतो, असे रिची मेहता यांनी सांगितले.

# जनरेटिव्ह ‘एआय’मुळे मीडिया व्यवसायात परिवर्तन घडेल

**मुंबई -** मीडिया व्यवसाय आता केवळ माहिती किंवा करमणुकीपुरता मर्यादित न राहता अत्याधुनिक डिजिटल अनुभव देणाऱ्या उद्योगात परिवर्तित झाला आहे. जनरेटिव ‘एआय’मुळे मीडिया व्यवसायात परिवर्तन झाले असून ‘एआय’ ही केवळ कल्पना नसून व्यवसायासाठी उपयुक्त ठरणारी वस्तुस्थिती असल्याचे मत जनरेटिव्ह एआय संदर्भातील चर्चासत्रात व्यक्त करण्यात आले.

जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये वेव्हज-२०२५ समिटमध्ये वेव्हजएक्स मध्ये जनरेटिव्ह ‘एआय’ स्टार्टअप व्यवसायाचे आणि चए (मीडिया आणि मनोरंजन) स्टार्टअपचे िरेप द्वारे स्केलिंग या विषयावरील चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चा सत्रात उद्योग विषय तज्ञ महेश्वरन जी. आणि थड चे पुण्यब्रथा दासगुप्ता यांनी सहभाग घेतला.

‘एआय’चा वापर आता मीडिया आणि मनोरंजन क्षेत्रात नवे क्षितिज खुले करत आहे. या क्षेत्रातील कंपन्या व उद्योग एआयच्या मदतीने डिजिटल मूल्य निर्माण करत आहेत. ग्राहक अनुभव सुधारणे, उत्पादकता वाढवणे, जुन्या कंटेंटचा वापर करून नवे उत्पन्न मिळवणे आणि सर्जनशीलतेत वाढ या चार स्तंभांवर एआय आधारित यशस्वी मॉडेल तयार होत आहेत, असे या चर्चा सत्रात सांगण्यात आले.

# डिजिटल माध्यमातील प्रचार प्रसिद्धी मोहिमेसाठी अचूक डेटा आवश्यक - एम. ए. पार्थसारथी

## 'डाटा ड्राइवेन इनसाईट अँड मेजरमेंट इन ॲडव्हर्टायझिंग' परिसंवाद

**मुंबई -** डिजिटल माध्यमातून प्रचार प्रसिद्धीसाठी योग्य डेटा (माहिती) असणे आवश्यक असून जाहिरात प्रकियेत डेटा केंद्रबिंदू आहे. कोणत्याही प्रसिद्धी मोहिमेसाठी अचूक डेटा असणे महत्त्वाचे आहे. अचूक डेटा मिळविण्यासाठी शोध घेणे, योग्य नियोजन, योजना आणि मूल्यमापन आवश्यक आहे, असे ग्रुप एम साऊथ एशियाचे मुख्य धोरण अधिकारी एम. ए. पार्थसारथी यांनी सांगितले.

जिओ वर्ल्ड सेंटर येथील जागतिक दृकश्राव्य आणि मनोरंजन शिखर परिषद, २०२५ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'डाटा ड्राइवेन इनसाईट अँड मेजरमेंट इन ॲडव्हर्टायझिंग' या विषयावर श्री. पार्थसारथी बोलत होते.

श्री. पार्थसारथी म्हणाले, सामजिक संशोधनातून माहिती संग्रहित करताना नमुना निवड पद्धती, जनगणना, सर्वेक्षण, संभाव्यतेवर आधारित, निश्चित माहिती, निवडक ग्राहकांवर आधारित माहिती घेणे आवश्यक आहे. या माहितीच्या आधारे विविध डिजिटल माध्यमातून योग्य घटकांपर्यंत पोहोचणे सहज सोपे होते. डेटाचा उपयोग आज केवळ माहिती मिळवण्यासाठी नाही, तर संपूर्ण जाहिरात प्रक्रियेचा शोध, नियोजन, अंमलबजावणी, आणि मोजमाप या सर्व टप्प्यांमध्ये केला जातो. सध्या शासकीय, खासगी क्षेत्रात जाहिरातीचे महत्व वाढले आहे. वयोगट, लिंग, आवडीनिवडी, ऑनलाइन वर्तन यावर आधारित जाहिरातीसाठी माहिती गोळा करणे आवश्यक आहे. त्यामुळे ग्राहकासाठी डेटा गोळा करताना त्यांची स्पष्ट संमती आणि खात्री अत्यंत आवश्यक आहे, असेही श्री. पार्थसारथी यांनी सांगितले.

### अचूक माहिती संकलित करणे गरजेचे

ग्राहक स्वतःहून वेगवेगळ्या ब्रँडला डेटा देतो. पण त्यांची संमती आवश्यक आहे. यात खरेदीची योजना, वैयक्तिक माहिती, आवडीनिवडी आणि संवादाचे माध्यम निवडण्यासारख्या बाबींचा समावेश होतो. ग्राहकांच्या थेट संवादातून माहिती संकलित केली जाते, दुसऱ्या कंपनीकडून डेटा विकत घेतला जातो. याची अचूक माहिती संकलित केली जाते.

# कृत्रिम बुद्धिमत्ता युगातील एव्हीजीसीएक्सआर क्षेत्रातील बदलता प्रवाह या परिसंवादातील सूर

## 'चेंजिंग डायनामिक्स ऑफ एव्हीजीसी एक्सआर इन एआय एरा : हाऊ टू ब्रिज इंडस्ट्री अँड अक्ॅडमी' चर्चासत्र

**मुंबई -** कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) नवीन तंत्रज्ञानामुळे शिक्षण, उद्योग क्षेत्रात नवनवीन संशोधन सुरू झाले आहे.ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्स्टेंडेड रिॲलिटी क्षेत्रात मोठे बदल होत आहेत. ॲनिमेशन क्षेत्रात एआयचा वापर वाढला असला तरी सर्जनशीलता येणार नाही, ते कृत्रिम दिसेल, नैसर्गिक हे नैसर्गिकच राहणार असल्याचे या परिसंवादात तज्ज्ञांनी मत मांडले.

बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समधील जिओ वर्ल्ड सेंटर येथे पार पडलेल्या जागतिक दृकश्राव्य मनोरंजन परिषदेत 'चेंजिंग डायनामिक्स ऑफ एव्हीजीसी एक्सआर इन एआय एरा : हाऊ टू ब्रिज इंडस्ट्री अँड अक्ॅडमी' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यामध्ये अमेरिकन शिक्षणतज्ज्ञ ब्रियना यान्हौसे, अमेरिकेतील ॲनिमेशन तज्ञ प्रमिता मुखर्जी, अस्पाचे संचालक संजय खिमेसरा सहभागी झाले होते. तर समन्वयक म्हणून विनिता बच्चानी यांनी काम पाहिले.

**कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे सर्जनशीलतेचा नवा अध्याय - ब्रियना यान्हौसे**

विद्यार्थ्यांनी एक एआयचा वापर नवीन कल्पना, संशोधन आणि कलेतील नव्या कल्पकता शोधण्यासाठी करावा. विद्यार्थ्यांना शाळा,महाविद्यालयातसुद्धा नवीन तंत्रज्ञान याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थी तंत्रज्ञानासोबत लवकर जुळवून घेऊन सर्जनशीलतेसह नेतृत्व करतील, असे श्रीमती यान्हौसे यांनी सांगितले.

**विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख शिक्षण आवश्यक - संजय खिमेसरा**

देशाच्या अर्थव्यवस्थेत शिक्षणाचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. कुशल मनुष्यबळ निर्माण करणे, नवसंशोधनाला चालना देणे आणि उद्योगांच्या गरजा पूर्ण करणे महत्वाचे आहे. यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (छएझ २०२०) प्रभावीपणे राबवण्यासाठी विविध अभिनव आणि परिवर्तनशील उपक्रम हाती घेतले पाहिजे. विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे महत्वाचे आहे त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी कौशल्यवृद्धी, प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव आणि रोजगारक्षमतेच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरेल, असे अस्पाचे संचालक संजय खिमेसरा यांनी सांगितले.

**कृत्रिम बुद्धिमत्ता ही संधी आहे, धोका नाही - प्रमिता मुखर्जी**

ॲनिमेशन हे सर्जनशील क्षेत्र आहे. एआय हे रिपिटेटिव्ह, प्रक्रियात्मक कामे, डेटा ट्रान्सफर, प्लगइन लेखन या गोष्टींसाठी उपयुक्त आहे, पण सर्जनशील क्षेत्र अजूनही मानवकेंद्रित राहील. सर्जनशील कलाकारांसाठी संधी कमी होणार नाहीत. कृत्रिम बुद्धिमत्तेकडे आपल्या कौशल्यात वाढ करून देणारी संधी म्हणून बघायला हवे, असे मत ॲनिमेशन क्षेत्रातील अमेरिकेतील ॲनिमेशन तज्ज्ञ प्रमिता मुखर्जी यांनी व्यक्त केले.

# नात्यातील गोडवा नका होऊ देऊ कडवा...

आजकालच्या माणसांमध्ये स्वार्थ खूप बोकाळला आहे. स्वार्थापायी नात्यातील गोडवा व आपुलकी दिवसेंदिवस कमी होऊन रक्ताची नाती तटातट तुटत आहेत. नात्यांमध्ये दुरावा निर्माण होऊन नाते अक्राळ विक्राळ रूप धारण करत आहेत. स्वार्थ साधण्यासाठी माणूस कोणत्याही थराला जाऊन वाट्टेल ते कृत्य करत आहे. पैशासाठी जवळच्या नात्याला पायदळी तुडवून खोट्या नात्याला जवळ करत आहे. स्वतःच्या आई-वडिलांना अंतर देऊन बायकोच्या आई-वडिलांना जवळ करत आहे. म्हणजे आजकालची दुनिया खऱ्या नात्याला विसरून खोट्या नात्यात रममान झाली आहे. स्वार्थापायी शेतीच्या व घराच्या वाटणीवरून भावाभावांत वैर निर्माण होत आहे. आणि हे वैर विकोपाला जाऊन सख्खे भाऊ पक्के वैरी बनून एकमेकांचा काटा काढण्यासाठी एकमेकांवर टपले आहेत. आई वडील शेती व घर नावावर करत नाहीत म्हणून आई-वडिलांना घराबाहेर काढले जात आहे. अथवा त्यांना ठार मारले जात आहे. अशी भयानक परिस्थिती सध्या देशात निर्माण झाली आहे. बहिण शेतीची व घराची वाटणी मागत आहे, म्हणून बहिणी सोबत अबोला धरला जात आहे. वेळेवर पैशाची परतफेड न केल्यामुळे देखील नात्यांमध्ये कटूता निर्माण होत आहे. भावाने मुलाला मुलगी न दिल्यामुळे बहिण भावावर नाराज होत आहे. अथवा भाऊ बहिणीवर नाराज होत आहे. एखाद्या कार्यक्रमाला वा लग्नाला न आमंत्रित केल्यामुळे देखील नात्यांमध्ये द्वेष निर्माण होत आहे. घरातील सदस्य आजारी पडल्यावर नातेवाईक बघायला न आल्यामुळे देखील नात्यात कडवटपणा निर्माण होत आहे. तसेच घरातील सदस्य मृत्यू पावल्यावर अंत्यविधीला न आल्यामुळे देखील नातेवाईकांमध्ये कमालीची कटुता निर्माण होत आहे. आणि नातेवाईक एकमेकांचे तोंड देखील बघायला तयार होत नाहीत. अशा लहान सहान कारणांमुळे नात्यांमधील मायेचा ओलावा आटून नात्यात दुरावा निर्माण होत आहे. आणि रक्ताची नाती तटातट तुटत आहेत. खरेतर आजकाल नाती तुटायला पैसा व श्रीमंती कारणीभूत आहे. एखाद्या व्यक्ती जवळ भरपूर संपत्ती व पैसा आला की, तो व्यक्ती स्वतःला श्रेष्ठ समजायला लागतो. माणूस अहंकारी व गर्विष्ठ बनून इतरांना तुच्छ समजायला लागतो. त्याला वाटते की, लोकांनी मला स्वतःहून बोलावे, माझ्या मागे पुढे फिरावे आणि माझ्या श्रीमंतीचे गोडवे गावे, असे त्यांना मनोमन वाटते. म्हणून ते स्वतःला जरा वेगळेच समजतात. अशा गर्विष्ठ, अहंकारी व पैशाचा माज चढलेल्या लोकांना नात्याची जराही किंमत व कदर नसते. म्हणूनच आजकाल पैशापुढे नाते टिकणे अशक्य झाले आहे. जोपर्यंत माणसाजवळ पैसा व संपत्ती आहे, तोपर्यंत माणूस नात्याला विसरून जात आहे. आणि मग एकदा पैशाची नशा उतरली की, माणूस बरोबर रुळावर येऊन नात्याला जिवापाड जपायला लागतो. नात्याला महत्त्व द्यायला लागतो.

सगळ्यात नाजूक नाते हे प्रेमाचे असते म्हणजेच पती-पत्नीचे असते. आणि या पती-पत्नीच्या नाजूक नात्यात शंकेची पाल चुकचुकली की, संसाराचं घरटं मोडायला आणि जीवनाचं वाळवंट व्हायला वेळ लागत नाही. म्हणून पती-पत्नीने एकमेकांना समजून घेतले पाहिजे. एकमेकांवर विश्वास ठेवला पाहिजे. म्हणजे नात्यात आपोआप गोडवा निर्माण होऊन नाते अधिक घट्ट व्हायला लागते.

म्हणून कोणत्याही नात्यात विश्वास खूप महत्त्वाचा असतो. पती-पत्नीचे नाते, बहिण भावाचे नाते, बाप लेकाचे नाते, मामा भाच्याचे नाते आणि शिक्षक विद्यार्थ्यांचे नाते हे पूर्णपणे विश्वासावर अवलंबून असते. या नात्यात जोपर्यंत विश्वासाला तडा जात नाही तोपर्यंत हे नाते कोणाच्या बापालाही तोडता येत नाही. हे नाते कायम आनंदाने नांदत राहते. फक्त गरज आहे ती एकमेकांना समजून घेऊन एकमेकांवर विश्वास ठेवण्याची. आणि नात्याला जिवापाड जपण्याची.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई या दोघांचा एकमेकांवर खूप विश्वास होता. एकमेकांवर जीवापाड प्रेम होते. म्हणून या दोघांच्या नात्यात कधीच शंकेची पाल चुकचुकली नाही. शेवटपर्यंत माता रमाईने डॉ.बाबासाहेबांना तोलामोलाची साथ दिली. आणि डॉ.बाबासाहेबांनी देखील पत्नी रमाईवर विश्वास ठेवून उच्च शिक्षणाचा पर्वत लीलया सर केला. म्हणून या दोघांचा संसार यशस्वीपणे पार पडला. पण आजकाल पती-पत्नीचे नाते अनैतिक संबंधातून तटातट तुटून सुखी संसाराचे वाटोळे होत आहे. पती-पत्नीच्या घटस्फोटाच्या कित्येक केस कोर्टात दाखल आहेत. याला कारणीभूत दोघेही पती-पत्नी आहेत. पत्नी पर पुरुषासोबत अनैतिक संबंध ठेवते तर पती पर स्त्री सोबत अनैतिक संबंध ठेवतो. आणि जेव्हा या दोघांचे अनैतिक संबंध उघडे पडतात तेव्हा मात्र यांचा संसार उध्वस्त होऊन जीवनाचे वाळवंट होऊन जाते.

म्हणून आजकालच्या महिलांनी व पुरुषांनी छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच सावित्रीबाई फुले, माता रमाई , माता जिजाऊ व माता भिमाई या महापुरुषांचा व महामातांचा आदर्श घेऊन आपल्या संसारात सुखाची व आनंदाची मंगलमय पहाट आणावी. म्हणजे आपल्या नात्यातील गोडवा कधीच होणार नाही कडवा...हे लक्षात ठेवा.

छत्रपती शिवरायांसमोर काळ्या रात्री मुस्लिम समाजाची एक सुंदर तरुणी आली होती. आणि ती छत्रपती शिवरायांवर प्रेम करत होती. पण छत्रपती शिवरायांनी त्या सुंदर तरुणीला आईची उपमा दिली होती. शत्रूच्या ही स्त्रीला मातेसमान मानणारा राजा पुन्हा होणे नाही...

डॉ.बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला असताना, बाबासाहेबांची विद्वत्ता व टॅलेंट पाहून एका सुंदर तरुणीने बाबासाहेबांना प्रपोज केला होता. तेव्हा बाबासाहेब म्हणाले बरं झालं मला एक बहीण मिळाली.बाबासाहेबांचे माता रमाईवर जीवापाड प्रेम होते. म्हणून त्या तरुणीला डॉ.बाबासाहेबांनी बहिणीची उपमा दिली. म्हणून यांच्या संसारात कधीच वाईटपणा आला नाही...



कारण तेव्हाची संस्कृतीच तशी सुसंस्कारी व चारित्र्यसंपन्न होती. एकमेकांवर मनापासून विश्वास ठेवणारी होती. तेव्हा विश्वास या शब्दाला खूप महत्त्व होते. प्रत्येक जण आपापले नाते प्रामाणिकपणे निभावण्यात व्यस्त होते. तेव्हाच्या लोकांनी नात्यातील गोडवा कधीच होऊ दिला नाही कडवा. तेव्हाच्या महिला देखील आपल्या शिलाला व चारित्र्याला जीवापाड जपायच्या. आपल्या पतीला देवा समान मानून त्याची पूजा करायच्या. तेव्हा पती-पत्नीच्या नात्यात, बापलेकाच्या नात्यात, बहिण भावाच्या नात्यात, मामा भाच्याच्या नात्यात व मित्र-मैत्रिणीच्या नात्यात एक प्रेमाची व मायेची अतुट नाळ जोडलेली होती. म्हणून यांचा एकमेकांवर अफाट विश्वास होता. म्हणून यांच्या नात्यात कधीच दुरावा निर्माण झाला नाही की, कडवटपणा आला नाही. आणि शंकेची पाल देखील चुकचुकली नाही. ही तत्कालीन वस्तुस्थिती कोणालाही नाकारता येणार नाही. आपणही तत्कालीन महापुरुषांचा, महामातांचा व स्त्री-पुरुषांचा आदर्श घेऊन नात्याची जोडलेली नाळ अधिक घट्ट करावी...

म्हणजे आपल्या नात्यात कधीच दुरावा निर्माण होणार नाही. आणि नात्यातील गोडवा कधीच कडवा होणार नाही...

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# राष्ट्रीय सेवेत चिकित्सकांचे अमूल्य योगदान - डॉ. सत्यप्रकाश चौहान

## देशभरातील यशस्वी चिकित्सकांचा गौरव समारंभ

**बदनापूर । प्रतिनिधी -** राष्ट्राच्या उभारणीत वैद्यकीय क्षेत्राचाही मोठा सहभाग असून राष्ट्रीय उन्नतीसाठी डॉक्टरांचे (चिकित्सक) मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन विश्व आयुर्वेद परिषद व भारत आरोग्य संघटना यांनी आयोजित केलेल्या मानसिक ताण-तनाव नियंत्रणविषयक राष्ट्रीय सेमिनार येथे केले. या वेळी भारतभरातील विविध भागातील नामवंत व यशस्वी डॉक्टर्सचा सत्कार कार्यक्रम ही आयोजित करण्यात आला होता. यात जालना जिल्ह्यातील डॉक्टरांचाही म ोठा सहभाग होता.



या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मानसिक ताण-तणाव विषयक अभ्यासक प्रा.अरूण कुम ार पाणीग्राही (प्राचार्य, आर. जी. एस. मेडीकल महाविद्यालय,लखनौ),प्रा. आरती सिंह (एस.के.डी. फार्मसी महाविद्यालय) हे होते तर अध्यक्षस्थान डॉ.संजय रस्तोगी (मेडीकल डायरेक्टर, सुर्यसिटी हॉस्पिटल लखनौ) यांनी भूषविले होते. या वेळी पुढे बोलताना डॉ. सत्यप्रकाश चौहान यांनी डॉक्टर्स करत असलेल्या राष्ट्रसेवेचा उल्लेख करून सध्याच्या जीवन पध्दतीत मानसिक ताण-तणाव दूर करण्यासाठी विविध उपायायोजना कथन केल्या. या वेळी देशभरातील विविध भागातील यशस्वी व नामवंत डॉक्टर (चिकित्सक) यांचा गौरव करण्यात आला. झंडू, मॅक्लॉईड, नेप्रौग्रिट आणि जीएलएचसी फार्मा या कंपनीने सहभाग घेऊन या कार्यक्रमात मानसिक ताण-तणाव प्रणालीबाबत विविध उपाययोजना करण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. याच कार्यक्रमात डॉ. सत्यप्रकाश चौहान, डॉ. गौरव शर्मा, डॉ.वैशाली गुप्ता, डॉ. संदीप मिश्रा, डॉ. रवी शुक्ला, डॉ. धमेंद्र सिंह,डॉ.स्वप्नील यांना वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्याबदद्ल सन्मानचिन्ह देऊन गौरवित करण्यात आले. या सेमीनारमध्ये देशभरातून मोठया संख्येने डॉक्टर्स तसेच मानसिक उपचार

तज्ज्ञांनी सहभाग नोंदवला होता. कार्यक्रम ाच्या यशस्वीतेसाठी भारत आरोग्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. अरूण खैरे, डॉ. अजयकुमार सिंह,सचिन शांत आदींनी परिश्रम घेतले. या सेमीनारम धून सामाजिक व मानसिक ताण- तणाव जिवन प्रणाली विकसित करण्याचा मानस ही या वेळी व्यक्त करण्यात आला.

# शिवसेना लवकरच रायगडच्या आमदारांच्या नावाची लॉटरी उडवणार!

**माणगाव । प्रतिनिधी -** सध्याचे महाराष्ट्र सरकार स्थापन होऊन ६ महिने झाले आहेत. सर्व मंत्र्यांचे गेल्या १०० दिवसांचे पास-नापासांचे रिपोर्ट कार्ड सुद्धा नुकतेच जनतेसाठी सादर झाले आहे. त्यात अधिकृत नंतर बेकायदेशीर ठरवण्यात आलेल्या व पालकमंत्री पदाचा टिळा लावलेल्या ना.अदिती तटकरे पहिल्या क्रम ांकावर आहेत. मात्र प्रामुख्याने एक गोष्ट लक्षात येतेय ती म्हणजे लोकाभिमुख निर्णय घेण्यात हे राज्य सरकार संपूर्ण अपयशी ठरले आहे. सरकारी तिजोरीकडे लक्ष न देता निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर लाडकी बहिणी यासारख्या योजना आणल्या त्यामुळे यापुढे विकासकामांवर ताण पडणार आहे. सरकार सक्षम नसल्याचे प्रामुख्यानं प्रगती पुस्तकात दिसत आहे. अर्थमंत्री अजितदादा पवार म्हणजे मी बोलतो तेच करतो या भूमिकेतून केव्हाही बाहेर पडणार नाहीत. त्यामुळे शिवसेना पक्षातून गद्दारी करून बाहेर पडणाऱ्यांची तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशीच सर्कस ट्रिपल इंजिन सरकारची दिसणार आहे. आज दोन पक्ष फोडून आमदारांची जोडमोड करून फडणवीसांनी हे सरकार बहुमतात बनवले असले तरी पुर्णकाळ तडजोड करावी लागणार आहे. याचा पुरावा म्हणजे रायगड जिल्हयाचे पालकमंत्री तिढा सोडवताना तिन्ही नेत्यांना घाम फुटत असल्याचे प्रामुख्यानं दिसत आहे. दिल्लीश्वरांच्या ईशाऱ्यानेच आदिती तटकरे आणि भरतशेठ गोगावले यांच्यात भांडण लावून दिले आहे. त्यामुळे दोन पक्षांच्या वादात पालकमंत्री पदाची रस्सीखेची सुरु आहे. मुंबई-नवी मुंबई पासून तासाभरात येणाऱ्या रायगड जिल्याचा विकास झपाट्याने होतो आहे परंतु पालकमंत्री पदापासून रायगड जिल्ह्याला वांझोटे ठेवण्याला झारीतला शुक्राचार्य कोण आहे याची शोध रायगड जिल्ह्यातील नागरिकांनी घ्यावी असे आवाहन दक्षिण रायगड युवासेना समन्वयक शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे श्री अजिंक्य अरविंद मोरे आणि युवासेना तालुका अधिकारी श्री. कौस्तुभ विलास करडे यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

मुंबईसह राज्यातल्या २९ म हानगरपालिका, २६ जिल्हा परिषदा, २५७ नगरपालिका आणि २८९ नगरपंचायतींच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडल्या आहेत. रायगड जिल्ह्यात सुद्धा ही परिस्थिती आहे. महापालिका अथवा इतर सगळ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न झाल्यानं रोजची अनेक कामं अडली आहे. त्याचा वॉर्ड, अथवा प्रभाग पातळीवर परिणाम जाणवतो आहे. सगळ्याच शहरांत आणि गावांमध्ये हे ऐकू येतं आहे की, ही नेहमीची कामे कोण करणार? स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न झाल्यानं त्याचे परिणामही अनेक झाले आहेत. स्थानिक पातळीवरचे लोकप्रतिनिधी नसल्यानं लोकांची वॉर्ड पातळीवरची काम रखडली आहे. सगळी यंत्रणा ही अधिकाऱ्यांच्या हातात आहे. आज स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका झाल्या नसल्यानं लोकप्रतिनिधी नसल्याने जिल्ह्याचा कारभार सरकारी कर्मचाऱ्यांकडे असून त्यावर कोणत्याही प्रकारचा अंकुश सरकारचा दिसून येतं नाही. निवडणुका केव्हा जाहीर होणार यावर सुद्धा सरकार बोलायला तयार नाही आहे. जिल्हा नियोजन वाऱ्यावर आहे. विकासाला खुंटीवर टांगळे गेले आहे. जिल्ह्यातील वेगवेगळ्या शासकीय कमिट्या रिक्त असल्याने सरकारी कर्मचारी मुजोर झाले आहेत. याला रायगड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता त्रासली आहे असे चित्र सर्वच तालुक्यात दिसून येत आहे.

त्यात पालकमंत्रीपद कुणाकडे हे प्रतिष्ठेचे बनून दिवसेंदिवस तिढा वाढत आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणतात म ीच पालकमंत्री, राष्ट्रवादी म्हणते आमचा पूर्वीचाच पालकमंत्री, शिंदे गट म्हणतात आमचे ३ आमदार आहेत तेव्हा कोटवाले भरतशेठच हक्काचे पालकमंत्री आहेत.

सत्तेचे लोणी ओरबडण्यासाठी एकत्र आलेले सत्तापिपासू पालकमंत्री पदाचा तिढा महामंडळ नियुक्ती सारखा पाच वर्ष निर्णयाविना ठेवतील असेच एकंदरीत वाटते आहे. या सरकारच्या तिघांच्या वादात रायगडकरांचे मोठे नुकसान होतं असल्याचे आढळून येत आहे. पालकमंत्रीपदाचा हा चेष्टेचा विषय झाला असून या सरकारवर संपूर्ण रायगड जिल्हयातील जनता टीका करीत असल्याचे दिसून येत आहे. फडणवीस साहेबांना तातडीने निर्णय घ्यायला जमत नसेल तर शिवसेना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा गट लवकरच रायगड जिल्ह्याच्या हितासाठी सर्व आम दारांच्या नावे चिठ्या बनवून जाहीर सभेद्वारे पालकमंत्रीपदासाठी लॉटरी उडवण्याचा कार्यक्रम घेण्यास तयार आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.